# University of Mumbai

परीक्षा विभाग/
वाणिज्य निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८

१८ ऑक्टोबर, २०१७.

क्र.परीक्षा/वाणिज्य निकाल कक्ष/ ३६ /२०१७

## परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या खालील अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक यांना सुचित करण्यात येते की, नोव्हें., २०१७ (द्वितीय सत्र २०१७) मध्ये घेण्यात येणारी खालील नमुद केलेली शिक्षणक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या वेब लिंक वरून Online घेण्यात येणार आहे.

1. B.Com./BMS- Environment Management & Economics ( Sem- V & VI )
2. B.Com.- Investment Management ( Sem- V & VI )
3. B.Com.- Transport Management ( Sem- V & VI )
4. B.Com.- Financial Management ( Sem- V & VI )

वरील अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज **mu.ac.in ⟶ Exam & Results ⟶ examination ⟶ follow the instructions given on the page** या वेब लिंक वरून **Online** स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :–

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांनी Online अर्ज भरण्याची, Inward करण्याची व महाविद्यालयात त्याची प्रिंट सादर करण्याची तारीख | Form Submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | १८/१०/२०१७ ते २७/१०/२०१७ | ०१/११/२०१७ पर्यंत |

पुढे संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशिलाप्रमाणे– संबंधीत विद्यार्थ्यांनी आपले परीक्षा अर्ज mu.ac.in या संकेतस्थळावर Online भरून त्याची प्रिंट घेऊन आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करावेत व संबंधीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी Online भरलेले परीक्षाअर्ज आपल्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षाअर्जांचे Form Submission Report काढून तो Report व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात पहिला माळा, खोली क्र. ३६, वाणिज्य कक्ष, येथे हस्तेपोच जमा करावेत. पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही. तसेच परीक्षा अर्जांच्या प्रती (Examination Form Prints) विद्यापीठाकडे पाठवू नयेत.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी (२७/१०/२०१७ रोजी सायं. ६.०० वा.) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाहीत या बाबींची नोंद घेण्यात यावी.

परीक्षा प्रवेश अर्ज Inward झाल्यानंतर कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, यामुळे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत), विषय व इतर सर्व माहिती अचुक व बरोबर याची खात्री करून घ्यावी.

२/–

Scanned by CamScanner

(परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठी (देवनागरी) नाव टाकणे बंधनकारक आहे व तेच नाव त्यांच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. अन्यथा चूक झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.)

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

**(Web Link :- mu.ac.in → Exam & Results → examination → follow the instructions given on the page)**

**E-mail Id:- mu.ac.bcim@gmail.com**

**Contact No.: 022-26543399.**

स्थळ : मुंबई.
दि. १८ ऑक्टोबर, २०१७.

संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ.

---

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग.
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग.
३. सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र.

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित
१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ३२.
३. मा. प्र. कुलगुरू, मा. संचालक बीसीयुडी, मा. कुलसचिव व मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक.

संचालक,
परिक्षा व मुल्यमापन मंडळ.

Scanned by CamScanner